■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १९ ● अंक ४ ● मंगळवार, दि. १६ ते २३ जुन २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

■ २२ जूनपर्यंत अर्ज निश्चित करण्याचे आवाहन ■

## शासकीय आयटीआय, वाशिम येथे प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**वाशिम, दि. १६ जुन (जिमाका): कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), वाशिम येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.**

सध्याच्या स्पर्धात्मक युगात कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. औद्योगिक क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, प्रत्यक्ष प्रशिक्षण व रोजगाराभिमुख कौशल्ये प्रदान करण्याचे कार्य आयटीआयमार्फत केले जाते. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम तसेच खासगी उद्योगांमध्ये रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. तसेच स्वयंरोजगार व उद्योजकतेसाठीही आयटीआय शिक्षण महत्त्वपूर्ण ठरते. राज्य शासनामार्फत यावर्षी राज्यातील शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील सुमारे १.५७ लाखांहून अधिक जागांसाठी केंद्रीकृत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दहावी उत्तीर्ण तसेच पात्र उमेदवारांनी प्रवेशासाठी अर्ज करावेत. शासकीय आयटीआय, वाशिम येथे सीओपीए (कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट), इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, मेकॅनिक मोटार वाहन, मेकॅनिक डिझेल, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन, फॅशन डिझाईन टेक्नॉलॉजी, बेसिक कॉस्मेटोलॉजी, फूड प्रॉडक्शन, वूड वर्क टेक्निशियन तसेच मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स या १२ रोजगाराभिमुख व्यवसायांसाठी प्रवेश उपलब्ध आहे. संस्थेमध्ये आधुनिक कार्यशाळा, प्रशिक्षित व अनुभवी प्रशिक्षक, अद्ययावत यंत्रसामग्री तसेच उद्योगाभिमुख प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासोबतच रोजगार मार्गदर्शन, कॅम्पस मुलाखती, अप्रेंटिसशिप आणि करिअर सल्ला यावरही विशेष भर दिला जातो. प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून इच्छुक विद्यार्थ्यांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज भरावा. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तो संबंधित संस्थेत निश्चित (कन्फर्म) करण्याची अंतिम तारीख २२ जून २०२६ आहे. त्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आयटीआयमध्ये उद्योगाभिमुख व रोजगारकेंद्रित शिक्षण, कमी कालावधीत कौशल्य संपादन, शासकीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र, अप्रेंटिसशिप व रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगारासाठी भक्कम पाया, आधुनिक प्रयोगशाळा व कार्यशाळा सुविधा तसेच अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. अधिक माहितीसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सिव्हील लाईन, वाशिम येथे संपर्क साधावा.

■ विक्री व पैदाशीवर शासनाची बंदी

## आफ्रिकन मागूर माशापासून मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका

**वाशिम, दि. १६ जुन (जिमाका): बाजारात स्वस्त दरात उपलब्ध होणारा आणि आकाराने मोठा दिसणारा काळ्या रंगाचा आफ्रिकन मागूर मासा मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक असून नागरिकांनी तो खरेदी व सेवन करण्यापासून दूर राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) प्रियंका झोड यांनी केले आहे. शासनाने या माशाच्या पैदाशीवर तसेच विक्रीवर कडक बंदी घातली असून त्याची विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे.**

आफ्रिकन मागूर हा अतिशय आक्रमक आणि दूषित वातावरणातही सहज जगू शकणारा मासा आहे. गटारे, सांडपाणी तसेच औद्योगिक कचरा मिसळलेल्या पाण्यात त्याची वाढ होत असल्याने त्याच्या शरीरात शिसे, पारा आणि कॅडमियम यांसारख्या घातक जड धातूंचा संचय होण्याची शक्यता असते. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रदूषित माशांचे सेवन केल्यास शरीरात विषारी घटकांचे प्रमाण वाढून त्वचेचे विकार, पचनसंस्थेचे आजार तसेच दीर्घकाळात कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. याशिवाय हा मासा स्थानिक मत्स्यप्रजातींना नष्ट करून जलसंपत्ती व जैवविविधतेचे मोठे नुकसान करतो. देशी मागूर आणि आफ्रिकन मागूर यातील फरक आफ्रिकन मागूरचा रंग गडद काळा किंवा राखाडी असतो. त्याचे डोके मोठे, चपटे व त्रिकोणी आकाराचे असते. शरीर जाड, मांसल आणि लांब असून त्याची वाढ अतिशय वेगाने होते. त्वचा अधिक जाड, चिवट व बुळबुळीत असते. तसेच त्याच्या मिशा तुलनेने अधिक लांब असतात. याउलट देशी मागूरचा रंग पिवळसर-तपकिरी किंवा राखाडी असतो. त्याचे शरीर सडपातळ, मध्यम लांबीचे असून वाढ नैसर्गिक व तुलनेने संथ गतीने होते. संशयास्पद विक्री आढळल्यास त्वरित माहिती द्या आफ्रिकन मागूरची विक्री अथवा पैदास करणे हा कायद्याने गुन्हा आहे. ग्राहकांनी मासे खरेदी करताना विशेष दक्षता घ्यावी. कुठेही या माशाची विक्री होत असल्याचे आढळल्यास त्वरित मत्स्यव्यवसाय विभागाशी संपर्क साधावा. नागरिकांनी केवळ स्वस्त दर किंवा मोठा आकार पाहून या माशाची खरेदी करू नये. स्वतःच्या व कुटुंबाच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी सुरक्षित आणि प्रमाणित स्रोतांमधूनच मासे खरेदी करावेत, असेही आवाहन सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) प्रियंका झोड यांनी केले आहे.

## वृक्ष लागवड करण्याची गरज

**रिसोड** : वन्यप्राणी व मानव संघर्ष दिवसेंदिवस वाढीस लागला आहे. जंगलातील फळझाडे पूर्णतः नष्ट झाल्यामुळे जंगलातील प्राणी गावाच्या दिशेने येत आहेत. यामुळे जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात फळवगीऱ्य झाडांची लागवड करणे अत्यावश्यक बाब झाली आहे.

जंगलामध्ये फळवगीऱ्य झाडांची कमतरता असल्याने जंगलात राहणारे वानर, हरिण, डुक्कर यासारखे प्राणी गावाकडे, शेताकडे येऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. माकडांच्या हैदोसाने घराघरामधील फळझाडांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. हे प्राणी वाघ, बिबट या सारख्या हिंस्त्र प्राण्यांचे भक्ष्य ठरत आहेत. भक्ष्यांचा मागोवा घेत वाघ आणि बिबट गावाच्या दिशेने येऊन गावखेड्यात दहशत निर्माण करीत आहेत. पर्यायाने वन्यप्राणी व मानव संघर्ष वाढीला लागला आहे. हा संघर्ष थांबवून पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर जंगलामध्ये फळवगीऱ्य झाडांची लागवड करणे अत्यावश्यक आहे. फक्त झाडे लावूनच होणार नाही तर त्यांची जोपासना योग्य पद्धतीने करून किमान पाच ते दहा वर्षांपर्यंत संगोपन करण्याचीही जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे. वन विभागाने मागील अनेक वर्षांपासून केवळ इमारती लाकूड मिळविण्याच्या दृष्टीनेच झाडांची लागवड केली आहे. **श.प्र.**

## खरीप पेरण्यावर अस्मानी संकट, बळीराजा चिंतेत

**वाशिम:** रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यानंतर मृग नक्षत्रही संपत आले तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने मंगरुळपीर तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेल्या पावसाअभावी ऊडिद,ज्वारी, मूग आणि सोयाबीनच्या पेरण्या धोक्यात आल्या असून बळीराजासमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

मान्सून वेळेत दाखल होईल आणि पेरण्यांना वेग येईल या आशेने शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण करून खरीप हंगामाची तयारी केली होती. मात्र जूनचा अर्धा महिना संपला



तरी पावसाने हजेरी न लावल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. बळीराजा दररोज आकाशाकडे अपेक्षित नजरेने पाहत असून आता संपूर्ण भिस्त ही आर्द्रा नक्षत्रावर अवलंबून आहे.

८ जून रोजी लागलेले मृग नक्षत्र कोरडेच गेले आहे. आता २२ जून रोजी आर्द्रा नक्षत्र लागत असून या नक्षत्रात पेरणीयोग्य पाऊस न झाल्यास मंगरुळपीर तालुक्यातील शेतकऱ्याचे सर्व आर्थिक नियोजन कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.शेतकरी यांनी सांगितले की, बळीराजा पाऊस, दुष्काळ, वादळ अशा संकटांशी नेहमीच लढत असतो. तालुक्यातील शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणाचा कायमच फटका बसतो. आगामी नक्षत्रात पाऊस झाला नाही तर पिकांचे आणि आर्थिक नियोजन कोलमडणार आहे. खरीप हंगामातील पेरण्या वेळेत होणे गरजेचे असते. पाऊस लांबल्यास खरीपाबाबत साशंकता निर्माण होईल. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात बहुतांशी भागात मुगाची तसेच बाजरी आणि सोयाबीनची पेरणी उरकली जाते. परंतु वरुणराजाने हुलकावणी दिल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत. आर्द्रा नक्षत्रातही पाऊस न झाल्यास मूग पेरणीचे नियोजन कोलमडण्याची भीती आहे. उशिरा पेरणी झाल्यास उत्पादनावर परिणाम होऊन आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. आणि त्यातच वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे आणि खतांच्या दरांमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी पावसाची दडी अधिकच चिंताजनक ठरत आहे.

# भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा काळ

भारत आज विविध क्षेत्रांत अत्यंत वेगाने विकास करत आहे. अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा, ऊर्जा, पायाभूत सुविधा, राष्ट्रीय सुरक्षा, विज्ञान यांसह, विविध क्षेत्रांत देश नवनवी उंची गाठत आहे. भौतिक विकासाच्या या सर्व क्षेत्रात प्रगती करत असताना, हेही महत्त्वाचे आहे, की आपण आपली प्राचीन संस्कृती, इतिहास, वारसा आणि परंपरांना विसरून जाऊ नये.

भारत जगातील अतिप्राचीन मात्र जिवंत संस्कृतींपैकी एक देश आहे, कित्येक शतके, परदेशी आक्रमकांसोबत सुरू असलेल्या संघर्षात, देशाच्या राजकीय सत्तेत बदल होत राहिले, मात्र त्या काळातही, भारत आपली संस्कृती एका पिढीकडून, दुसऱ्या पिढीपर्यंत यशस्वीपणे सोपवत राहिला. या काळात झालेल्या राजकीय उलथापालथीत,आपली धार्मिक स्थळे, ग्रंथसंपदा, वाचनालये, विद्यापीठे, सगळ्यांचा विध्वंस करण्यात आला. मात्र तरीही, आपली संस्कृती आणि परंपरा जिवंत राहिल्या. सांस्कृतिक भारतावर दुसरा घाला आमच्या शिक्षण पद्धतीत केलेल्या बदलांमुळे घातला गेला. या हल्ल्यातून, आमच्या अंतर्मनात आपल्याच संस्कृतीविषयी हीन भावना निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

वर्ष २०२४ पासून, मात्र, भारताने आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासोबतच, सांस्कृतिक क्षेत्रात एक मोठे परिवर्तन घडण्यास सुरुवात झाली, हे वर्ष आपल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या प्रारंभाचे वर्ष म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सांस्कृतिक भारत आज आपल्या अभिमानास्पद भूतकाळाचे पुन:स्मरण करत, त्याचे वैभव, त्याची भव्यतेची पुनर्स्थापना करत आहे, त्याचवेळी सामाजिक जीवनात देखील तीच संस्कृती पुन्हा स्थापन केली जात आहे. आज आपले उत्सव, प्राचीन आणि ऐतिहासिक स्मारके, खाद्यसंस्कृती, वस्त्र कला, नृत्य, संगीत, शास्त्र, शिल्पकला ह्या सगळ्या गोष्टी जागतिक आकर्षणाचे केंद्र बनल्या आहेत.भारतीय संस्कृतीची वाढती स्वीकारार्हतागेल्या १२ वर्षांत जगात भारतीय संस्कृती केवळ स्वीकारार्ह ठरली नाही, तर लोकप्रिय होते आहे.

आज सगळे जग, २१ जूनला योग दिवस साजरा करतात. हा केवळ शारीरिक व्यायाम नाही, तर, हे एक प्राचीन भारतीय दर्शनशास्त्र आहे, एक विज्ञान आहे जे आज जगन्मान्य झाले. मानवी आयुष्यात त्याची उपयुक्तता बघा, त्याला जगाने स्वीकारले. आज जगातील अनेक देशात असलेल्या आपल्या वारशाच्या वस्तू, भारतात परत आणल्या जात आहे, त्यांची संख्या देखील, एक अत्यंत रोचक वास्तव आहे. वर्ष २०१३ च्या आधी, केवळ १३ वारसा वस्तू परदेशातून भारतात आणल्या गेल्या. मात्र गेल्या १२ वर्षांत ६४० पेक्षा अधिक वारसा वस्तू, परदेशातून भारतात आणल्या गेल्या आहे. संस्कृतीमध्ये केवळ परंपरांचे पुनरुज्जीवन नाही, तर संस्कृतीची प्रतीक चिन्हे परत आणण्यातही आम्ही गांभीर्य दाखवले आहे. ही प्रतीक चिन्हे, आमच्यासाठी अभिमानाचा विषय आहे, ह्या आमच्या पूर्वजांची कला, शिल्प आणि विविध विषयांच्या ज्ञानाच्या खुणा आहेत, चिन्हे आहेत, ज्यातून आपल्याला प्रेरणा मिळते आहे.

## आसेगावपेन ते कोयाळी बुद्रुक रस्त्यावर अनेक झाडे कोलमडल्याने रस्ता बंद



**नागरीक अडकले**

**रिसोड** - तालुक्यातील रिठद सर्कल मधील आसेगावपेन ते कोयाळी बुद्रुक रस्त्यावर अनेक झाडे आहेत.काल दि.१२ जुनं रोजी रात्री ११ वा.च्या सुमारास तुफान वादळी हवामानामुळे या रस्त्यावर अनेक झाडे तूटून पडली आहे.

त्या सोसाटच्याा वाऱ्यामुळे हि झाडे रस्त्यावर कोलमडल्याने हा वाहतूकीचा रस्ताच बंद झाला. अनेकप्रवाशी तथा दुचाकी - चार चाकी वाहन धारकांना रात्रभर रस्त्यावरच अडकून पडावे लागले. त्यामुळे मनःस्ताप सहन करावा लागला. यासाठी बांधकाम विभागाने हि तूटलेली झाडे हटवण्यासाठी तात्काळ उपाययोजना करावी व प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी या प्रवाशांनी केली आहे. याबाबतची माहिती आसेगावपेन येथील सामाजिक कार्यकर्ते भारत जनार्धन खंडारे यांनी रात्री उशिरा दिली आहे.

# तामसी येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

**वाशिम, दि. १६ जुन (जिमाका): जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम व जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने तामसी येथील ग्रामपंचायत कार्यालयात कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने झाली. अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना ज्येष्ठ नागरिक कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.**

यावेळी जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष वैभव तिफने यांनी नालसा संवाद योजना-२०२५ विषयी माहिती दिली. तसेच मुख्यन्यायरक्षक परमेश्वर आ. शेळके यांनी नालसा जागृती योजना-२०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास तामसी ग्रामपंचायतीच्या सरपंच भाग्यश्री कव्हर तसेच ग्रामपंचायत अधिकारी लिंबाजी लांडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे कोषाध्यक्ष डी. डी. गुडदे यांनी केले. आभार प्रदर्शन हर्षल बोबडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन विनोद कव्हर यांनी केले. कार्यक्रमात तामसी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध कायदेविषयक योजनांची माहिती घेतली. जनसामान्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# उमेद अभियानाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन



रिसोड : -शेती वाचवा अभियानांतर्गत दिनांक ९ जून २०२६ रोजी चिखली, ता. रिसोड येथे उमेद अभियानांतर्गत कवठा-चिखली सर्कलच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उमेद अभियानाचे तालुका समन्वयक खानझोडे, चिखलीच्या सरपंच सौ. मनिषाताई अंभोरे, कवठा-चिखली प्रभाग समन्वयक सौ. बाली वानरे, तसेच विविध बँकांचे अधिकारी व महिला बचत गटांच्या प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित महिला बचत गट सदस्यांना कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, मृदा आरोग्य संवर्धन ,मानवी पोषणसुरक्षा आणि पोषण परसबाग या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल व वैज्ञानिक मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या गृहविज्ञान तज्ज्ञ कु. शुभांगी वाटाणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मृदा परीक्षणाच्या आधारे शिफारशीनुसार संतुलित खतांचा वापर केल्यास जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म टिकून राहतात. यामुळे मातीची सुपीकता वाढते, अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर होतो, उत्पादन खर्च कमी होतो आणि पिकांची उत्पादकता व गुणवत्ता वाढण्यास मदत होते. तसेच अन्नधान्य, भाजीपाला व फळांमधील पोषणमूल्ये सुधारून मानवी आरोग्य अधिक सुदृढ व निरोगी राहण्यास हातभार लागतो, असे त्यांनी प्रतिपादन केले.तसेच पोषण परसबाग ही संकल्पना कुटुंबाच्या पोषणसुरक्षेसाठी अत्यंत प्रभावी साधन असल्याचे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, घराच्या परिसरात उपलब्ध जागेचा उपयोग करून विविध पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्ये आणि फळपिकांची लागवड केल्यास वर्षभर ताजे, सुरक्षित, पौष्टिक व रसायनमुक्त अन्न उपलब्ध होऊ शकते. यामुळे विशेषतः महिला, बालके, गर्भवती व स्तनदा माता यांच्यातील सूक्ष्मपोषक घटकांची कमतरता कमी करण्यास मदत होते. कार्यक्रमात उपस्थित महिला बचत गट सदस्यांनी मार्गदर्शनाचा उत्स्फूर्त लाभ घेतला व मृदा आरोग्य संवर्धन, संतुलित खत व्यवस्थापन, पोषण परसबाग निर्मिती आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब करण्याचा संकल्प व्यक्त केला.(वि. प्र.)


# कृषि विभाग -महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण कामाची इ-निविदा सुचना

उपविभागीय कृषि अधिकारी, वाशिम यांचेकडून **सा.बां. वि. महाराष्ट्र शासन यांचेकडील वाशिम जिल्हयातील योग्य त्या वर्गातील मजुर कामगार सहकारी संस्था** असलेले कंत्राटदाराकडून नमूद केलेल्या कामांकरिता ऑनलाईन ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेचा सविस्तर कार्यक्रम, सुचना व अटी शर्ती : **https//:mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **दि. १५/०६/२०२६ ते २२/०६/२०२६** पर्यंत कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध आहेत. योजना : - जलयुक्त शिवार अभियान - २.० सन २०२६-२७ अंतर्गत

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत रु. | निविदा योजना सुचना क्र. |
|---|---|---|---|
| १ | ढाळीचे बांध मौजे- तोंडगांव पा.क्र. पिजी-२३/०२/१० गट क्र. ४,५, पिजी-२३/०२/०७ गट क्र. १ ता.जि. वाशिम | १४१०७७०/- | ब-१/२९/JSA 2.0 |
| २ | ढाळीचे बांध मौजे - तोंडगांव पा.क्र. पिजी-२३/०२/०७ गट क्र. २,३,४ ता.जि. वाशिम | १३५३१०२/- | ब-१/३०/JSA 2.0 |
| ३ | ढाळीचे बांध मौजे कळमगव्हाण पा.क्र. पिजीकेए-१/०४/०७ गट क्र. १,२,३ ता. रिसोड जि. वाशिम | १२५७९६१/- | ब-१/३९/JSA 2.0 |
| | एकूण | ४०२१८३३/- | |

स्वाक्षरीत/-

जिमाका/वाशिम/जाहिरात/४१/२०२६ — **उपविभागीय कृषि अधिकारी, वाशिम**


**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, सा्प्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# प्रतिमा जुमडे शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित

रिसोड : येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रतिमा अमोल जुमडे यांना सामाजिक क्षेत्रामधील उल्लेखनीय कार्याबद्दल शिवछत्रपती पेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा नियुक्ती समारंभ व गुणवंत विद्यार्थी त्याचबरोबर सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजक मुख्याध्यापक तथा विद्यार्थी हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य वाशिम जिल्हा अध्यक्ष सुमित जमदाडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते कार्यक्रमांमध्ये अध्यक्षस्थानी रिसोडचे नगराध्यक्ष भगवानदादा क्षीरसागर हे उपस्थित होते त्याचबरोबर मुख्य मार्गदर्शक म्हणून रिसोडच्या कार्याध्यक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम व पंचायत समिती सदस्य राहुल भाऊ बोडखे व जिल्हाध्यक्ष सुमित जमदाडे व पत्रकार केशव गरकळ व नगरसेवक अमोल लोथे हे उपस्थित होते कार्यक्रमांमध्ये मुख्य व्याख्याते डॉक्टर सिद्धार्थ इंगोले सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले पुरस्कार प्राप्त प्रतिमा अमोल जुमडे रिसोडमध्ये विदर्भ मेडिकल मुख्य दोन शाखा आहेत त्याचबरोबर सामाजिक



कार्यामध्ये मोलाचा वाटा आहे आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमांमध्ये सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला रिसोड येथील प्रतिमा अमोल जुमडे समाजिक कार्यकर्ते असून त्यांनी समाजातील गोरगरीब व गरजू व्यक्तींना नेहमी सहकार्य मदत करतातरा समाजहिताच्या विविध उपक्रमांमुळे वाशिम जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी केलेल्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शिवछत्रपती पेरणा पुरस्कार मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आले कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी हक्क कृती समितीचे सर्व पदाधिकारी व गुणवंत विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा मित्र साहिल जाधव व अश्विनी खैरे यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुल वाशिमकर सर यांनी केले

# 'बी दि चेंज फाउंडेशन' तर्फे इरशाद अहमद यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' प्रदान!

## शिर्डी येथे पार पडला सोहळा



रिसोड : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक व सहशालेय कार्यातील उत्कृष्ट सेवेची दखल घेत रिसोड शहरातील डॉ अल्लामा इकबाल उर्दू प्रायमरी स्कूलचे शिक्षक इरशाद अहमद मुशताक अहमद यांना यंदाचा मानाचा 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 'बी दि चेंज फाउंडेशन' (शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर) संस्थेच्या वतीने आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला.दिग्गजांची सोहळ्याला उपस्थिती संस्थेच्या वतीने आयोजित या पुरस्कार सोहळ्याच्या (पर्व ४ थे) मुख्य कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली होती. यामध्ये निवृत्त मेजर कर्नल सुभेदार दिनकर रतन पवार, सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री निविदिता पगारे, डॉ. प्रकाश कोडपे, बाबासाहेब कापे आणि दादासाहेब ढोकचवडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते इरशाद अहमद मुशताक अहमद यांना सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.अथक परिश्रम आणि समर्पणाचा गौरव इरशाद अहमद यांनी शिक्षण क्षेत्रात व अल्पसंख्याक समाजासाठी केलेले कार्य अतिशय प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम आणि त्यांची निष्ठा अनेक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. "हा सन्मान म्हणजे शिक्षकांच्या कार्याचा, अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा गौरव आहे," अशा भावना यावेळी आयोजकांनी आणि उपस्थितांनी व्यक्त केल्या.हा सोहळा रविवार, ०७ जून २०२६ रोजी शिर्डी येथे अत्यंत उत्साहात पार पडला.

# पैनगंगा आदर्श महिला प्रभाग संघ रिठदची वार्षीक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



**रिसोड**- रिठद या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.व पैनगंगा महिला प्रभाग संघाच्या अहवालाचे वाचन करण्यात आले.

व त्या सर्वच ठरावाला सर्वच उपस्थित सदस्यांनी समर्थन दिले.व ठराव मंजूर करण्यात आले.हे वाचन तिलोत्तमा परशराम बोरकर यांनी केले. उमेद, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा परिषद वाशिम, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष रिसोड अंतर्गत स्थापन पैनगंगा आदर्श महिला प्रभागसंघ रिठद.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.प्रकल्प संचालक व जिल्हा वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक सर्व साधारण सभा आयोजित करण्यात आली होती, सभेमध्ये मागिल वर्षाचा सर्व लेखांजोखा वाचन करण्यात आला. तसेच चालू वर्षात उपजिवाका वाढ करण्यासाठी कर्ज वितरण व योजनांची माहिती तालुका अभियान व्यवस्थापक .राजकुमार खानझोडे यांनी दिली. बॅक कर्ज व बॅक व विमा योजनाचा लाभ घ्यावा असे आवाहन बॅक ऑफ महाराष्ट्र चे मॅनेजर सुमित सोळंके यांनी केले.सभेला उपस्थित शिवसेना ( ऊ.बा.ठा. )तालुका प्रमुख नारायण आरु यांनी महिलांना सामाजिक कार्यात सहभाग घेण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले.तर माजी पं.स. सदस्य गजानन आरू यांनी महिलांना उद्योग व्यवसाय वाढ करावे याबाबत मार्गदर्शन केले. उपस्थित समुहातील महिला,रिठद प्रभाग केडरच्या तिलोत्तमा परशराम बोरकर व सहकारी यांनी सभेचे आयोजन केले तर प्रभाग समन्वयक चंदाश्री जाधव खानझोडे यांनी आभार प्रदर्शन केले.

# नेतंसा येथे मध्यरात्री शॉर्ट सर्किटमुळे किराणा दुकानाला भीषण आग



## अंदाजे २० लाखांचे नुकसान

**रिसोड** - नेतंसा येथे मध्यरात्रीच्या सुमारास २.०० वाजता शॉर्ट सर्किटमुळे एका किराणा दुकानात भीषण आग लागून अंदाजे २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, दुकान बंद असतांना मध्यरात्री अचानक दुकानातून धूर व आगीच्या ज्वाला दिसू लागल्या. काही नागरिकांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी तातडीने दुकानमालकाला माहिती दिली. आग वेगाने पसरत असल्याने परिसरातील नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र दुकानात मोठ्या प्रमाणात किराणा माल व इतर साहित्य असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. घटनेची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल होत अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आणली. मात्र तोपर्यंत दुकानातील मोठ्या प्रमाणावरील किराणा माल, विविध वस्तू, फर्निचर तसेच इतर साहित्य जळून खाक झाले होते.हे दुकान विजय मिठूलाल ओसवाल यांचे असून, प्राथमिक अंदाजानुसार या आगीत सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पंचनामा करण्या करिता महसूल अधिकारी मनोज केनवडकर, ग्रामपंचायत अधिकारी शिंदे व तसेच खालील प्रमाणे पंच नारायण धनीराम बाजड, अरुण साहेबराव बाजड, भागवत हरिभाऊ बाजड, राजू मिठूलाल ओसवाल, विनोद गणपतराव बाजड, गणेश बळीराम बाजड, संजय मिठूलाल ओसवाल, गजानन मुरलीधर बाजड, अभिमन्यू नारायण बाजड, विजय मिठूलाल ओसवाल पंचासमक्ष पंचनामा केला आहे. घटनास्थळी लाईनमन कर्मचारी सुद्धा आले होते प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून, संबंधित विभागाकडून घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन उत्साहात

**रिसोड** : महिला उत्कर्ष प्रतिष्ठान (सेक्शन ८ कंपनी) द्वारा संचालित आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, पुंडलिक नगर, देगाव (फाटा), ता. रिसोड, जि. वाशीम येथे १० जून रोजी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचा २८ वा वर्धापन दिन (इदर्ल्डूगदह उेंब) मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम संस्थेच्या अध्यक्षा तथा आमदार मा. भावनाताई गवळी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे गीत वाजवून करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठाच्या ध्वजाचे विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित सर्वांनी विद्यापीठाप्रती आपली निष्ठा व बांधिलकी व्यक्त करत वर्धापन दिनाचा उत्सव साजरा केला.

वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालय व संलग्न



रुग्णालयामार्फत समाजोपयोगी उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचे नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ. अश्विन पराती यांच्या पुढाकाराने गरजू रुग्णांसाठी १० डोळयांच्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आल्या( वि. प्र )

# जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

वाशिम, दि. १५ जून (जिमाका): जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त दिशा मुलींचे निरीक्षण गृह, बाल न्याय मंडळ, वाशिम येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थितांना 'पोक्सो कायदा : सुरक्षित बचपन, सुरक्षित भविष्य' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करून बालकांच्या संरक्षणासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींची माहिती दिली. कार्यक्रमास द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा मुख्य दंडाधिकारी, बाल न्याय मंडळ, श्रीमती ए. आर. फक्राबादकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी बाल न्याय (काळजी व संरक्षण) कायद्याबाबत मार्गदर्शन करताना बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि न्यायव्यवस्थेतील विविध तरतुदींविषयी माहिती दिली. यावेळी ॲड. महेंद्र भालेकर यांनी बालकामगार प्रतिबंधक कायद्याविषयी मार्गदर्शन करून बालमजुरी निर्मूलनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जागरूक राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ॲड. श्रीमती शुभांगी खडसे, सहाय्यक न्यायरक्षक यांनी केले. कार्यक्रमास दिशा मुलींच्या निरीक्षण गृहातील मुली तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेलगाव राजगुरु येथे तूर पिकाच्या एकात्मिक व्यवस्थापनाविषयी जनजागृती कार्यक्रम



रिसोड : -शेती बचाव अभियानांतर्गत तालुक्यातील शेलगाव राजगुरु येथे तूर पिकाच्या एकात्मिक पीक व्यवस्थापन विषयावर जनजागृती व शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्र वाशिमचे कृषी विद्या तज्ज्ञ . टी. एस. देशमुख यांनी शेतकरी बांधवांशी तर गृहविज्ञान तज्ञ सौ शुभांगी वाटाणे यांनी महिलांशी संवाद साधून खरीप हंगामातील शाश्वत व वैज्ञानिक शेती पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी . देशमुख यांनी पेरणीपूर्व मृदा परीक्षणाचे महत्त्व, जमिनीच्या आरोग्यानुसार संतुलित खत व्यवस्थापन, एकात्मिक पोषकद्रव्य व्यवस्थापन (घ्श), आंतरपीक पद्धतीद्वारे जोखीम कमी करणे, सेंद्रिय व जैविक घटकांचा वापर, तसेच तूर पिकातील कीड व रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक पीक संरक्षण उपाययोजना (छ्श)

शेलगाव राजगुरे येथील महीला कार्यक्रमात दिव्य स्पर्श शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्षा सौ. बालाबाई सोनवणे उपस्थित होत्या. यावेळी सौ. शुभांगी वाटाणे यांनी रासायनिक खतांच्या आणि कृषी रसायनांच्या अतिरेकी वापरामुळे मानवी आरोग्य, मृदा सुपीकता आणि पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी दिव्य स्पर्श शेतकरी उत्पादक कंपनीच्या सदस्यांसह महिला बचत गटातील महिला शेतकऱ्यांना उपलब्ध स्थानिक साधनसामग्रीचा वापर करून सेंद्रिय खत, जीवामृत, घनजीवामृत व इतर जैविक निविष्ठांची निर्मिती करण्याचे आवाहन केले. तसेच 'पोषण परसबाग' संकल्पनेद्वारे घरच्या घरी विषमुक्त, पोषणमूल्यांनी समृद्ध भाजीपाला उत्पादन करून कुटुंबाच्या पोषण सुरक्षिततेस हातभार लावण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. यामुळे कुटुंबाच्या आरोग्याबरोबरच शेतीचा

# रिसोड कृषी महाविद्यालयात पालक सभा उत्साहात



रिसोड : -डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथे दिनांक ९ जून २०२६ ला पाचव्या सत्राला नोंदणी करणारे विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आले या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विश्वस्त संजय उकळकर हे होते इतर प्रमुख उपस्थित मान्यवरामध्ये महाविद्यालयाचे तांत्रिक समन्वयक तथा कीटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र करडा वाशिम राजेश डवरे , कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष आपतुरकर तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ परमेश्वर देवडे यांची उपस्थिती लाभली सर्वप्रथम या पालक सभेचे प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयातील विस्तार शाखेचे प्रा दीपक मसूरकर यांनी पालक सभेचा उद्देश आणि त्यामधून साध्य करावयाच्या बाबी उपस्थित पालकांसमोर मांडल्या त्यानंतर विविध विषयात गुणानुक्रमे अव्वल असणाऱ्या प्रत्येकी एका विद्यार्थ्यांचा व त्याच्या पालकाचा महाविद्यालयाचे विश्वस्त संजय उकळकर यांच्या हस्ते संयुक्तरित्या पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

विशेष सल्लागार प्राध्यापकामध्ये डॉ आशिष आपतुरकर प्रा परमेश्वर देवडे प्रा निलेश कंकाळ व प्रा सुरज माने यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा लेखाजोखा सादर केला यांप्रसंगी महाविद्यालयाचे तांत्रिक समन्वयक राजेश डवरे यांनी विद्यार्थी पालक आणि प्राध्यापक यांच्या त्रिवेणी संगमातून भविष्यातील उज्वल विद्यार्थी घडविण्यासाठी काही टिप्स दिल्या तसेच कृषी महाविद्यालय रिसोड येथील जय अनंत स्पर्धा परीक्षा फोरम चा अधिक कार्यक्षमतेने लाभ घ्यावा असे याप्रसंगी आव्हान केले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष आपतुरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये संजय उकळकर यांनी महाविद्यालयामधील विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांच्या रोजगार निर्मितीसाठी कसा फायदा होईल आणि त्यामध्ये पालकांकडून अभिप्रेत असलेल्या बाबी यावर प्रकाश टाकला याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून एस डब्ल्यू बोडखे , राजेश लाटे. वाय जी पारवे भागवत वानखेडे, डायदार, रत्काडे यांनी आपले विचार व्यक्त केले पालक सभेचे सूत्रसंचालन प्राध्यापक दीपक मसुरकर तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ परमेश्वर देवडे यांनी केले (वि. प्र)

# कृषी कन्या व कृषी दुताद्वारे बीज उगवण क्षमता तपासणी



**रिसोड :** डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव म्हणजेच रावे या कार्यक्रमांतर्गत नोंदणी केलेल्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांद्वारे मौजे घोटा करडा मांगवाडी भोकरखेडा यासह इतर रावे गावात दिनांक २ जून २०२६ ते ९ जून २०२६ या कालावधीमध्ये शेतकरी बंधूकरिता बीज उगवण क्षमता तपासणी व बीज प्रक्रियेचे धडे देण्याकरता विशेष मोहीम राबविण्यात आली या प्रात्यक्षकातून सोयाबीन सारख्या महत्त्वाच्या खरीप पिकात पेरणीपूर्व बीज उगवण क्षमता कशी तपासावी तसेच पेरणीपूर्वी जैविक निविष्ठेमध्ये पीएसबी रायझोबियम व ट्रायकोडर्मा या जैविक निविष्ठाची बीज प्रक्रिया कशी करावी हे कृषी महाविद्यालयातील कृषी कन्या यांनी शेतकरी बंधूंना प्रत्यक्ष करून दाखवले तसेच आगामी खरीप पिकाकरिता तंत्रज्ञानासंदर्भामध्ये महत्त्वाच्या टिप्स सुद्धा दिल्या या मोहिमेमध्ये कृषी विज्ञान केंद्र करडा वाशीम येथील कीटक शास्त्रज्ञ तसेच महाविद्यालयाचे तांत्रिक समन्वयक राजेश डवरे यांनी तज्ञ मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली व प्रत्येक निवडलेल्या रावे गावामध्ये शेतकरी बंधूंना आगामी खरीप हंगामाच्या दृष्टिकोनातून एल निनो च्या पार्श्वभूमीवर वापरावयाचे शाश्वत पर्यावरणनिष्ठ कमी खर्चाचे खरीप पिकाचे तंत्रज्ञान तसेच प्रतिबंधात्मक पीक संरक्षण तंत्रज्ञान यावर प्रकाश टाकला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आशिष आपतुरकर उप प्राचार्य तसेच रावे कार्यक्रमाधिकारी डॉक्टर परमेश्वर देवडे विस्तार शाखेचे प्राध्यापक दीपक मसुरकर पशुसंवर्धन प्राध्यापक कृष्णा देशमुख प्रा सुरज माने यांच्यासह इतर रावे एसएमएस यांनी सुद्धा शेतकऱ्यांशी संवाद साधला या संपूर्ण मोहिमेमध्ये कृषी महाविद्यालय रिसोड येथील रावे विद्यार्थिनी व विद्यार्थी कु निकिता पातुरकर कु सलोनी माळेकर कु गायत्री मोरे कु कोमल देशमुख कु तनवी गोरे कु प्रांजल इंगोले कु भूमिका मेश्राम कु रूपाली कोकाटे गणेश वाळके कृष्णा कहाकर दुर्गेश राऊत आदित्य नवघरे आदित्य लाटे आदित्य नवघरे यांच्यासह इतर विद्यार्थी व विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग दर्शविला (वि. प्र)

# पाटील महाविद्यालयात नेत्र तपासणी शिबीर व नेत्रदान जनजागृती

रिसोड : स्थानिक जीवन विकास शिक्षण संस्था द्वारा संचलित स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. खडसे साहेब कावेरी नेत्रालय रिसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मंचावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव कोकाटे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांनी याप्रसंगी बोलताना नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान असुन डोळयांच्या आरोग्य काळजी घेण्याची गरज प्रतिपादन केली. जागतिक नेत्रदान दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये आयोजित शिबिरामध्ये डॉ. खडसे साहेबांनी ६० जणांच्या डोळयांची तपासणी करून गरजेनुसार चष्मा वापरणे तसेच इतर तपासण्यांविषयी सल्ला दिला. शिबिरामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक-सेविका पालक यांनी मोठ्या संख्येने व उत्स्फूर्तपणे सहभाग घेत नेत्रदानाचा संकल्प केला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. छाया खिल्लारे, सह कार्यक्रमाधिकारी डॉ. रवी खाडे यांच्यासह कावेरी नेत्रालयातील कर्मचारी वृंदांनी मोलाचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. केशव कोकाटे यांनी तर सूत्रसंचालन ऋतुजा कव्हर, आभार प्रदर्शन सोहम मुळे विद्यार्थ्यांनी केले. (वि. प्र)



# रोजगार, बेरोजगारी व असंघटित उद्योग क्षेत्राची माहिती संकलित करण्यासाठी वाशिममध्ये दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणांना प्रारंभ

**वाशिम, दि. १५ जुन (जिमाका): सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने राबविण्यात येणारे नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांचे वार्षिक सर्वेक्षण ही दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राज्यभर राबविण्यात येणार आहेत. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत ही सर्वेक्षणे केली जात आहेत.**

राज्यातील जिल्हानिहाय अचूक व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध व्हावी, हा या सर्वेक्षणांचा प्रमुख उद्देश आहे. नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षणाद्वारे रोजगार, बेरोजगारी, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार तसेच असंघटित रोजगार क्षेत्रासंदर्भातील अद्ययावत माहिती प्राप्त होणार आहे. तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांच्या वार्षिक सर्वेक्षणाद्वारे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील असंघटित उद्योग-आस्थापनांची संख्या, उपलब्ध रोजगाराचे प्रकार, कार्यरत कामगारांची संख्या, प्रति कामगार व प्रति आस्थापना स्थूल मूल्यवर्धन, उत्पादकता तसेच वेतन यांसारख्या महत्त्वपूर्ण निर्देशांकांची माहिती संकलित केली जाणार आहे. बांधकाम क्षेत्र या सर्वेक्षणातून वगळण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या आकडेवारीचा उपयोग शासनाकडून विविध विकासात्मक योजना व धोरणे तयार करताना केला जाणार आहे. या सर्वेक्षणांच्या कार्यारंभाचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अनिल बी. रेठे, उपायुक्त, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, वाशिम, कार्यालयातील कर्मचारी तसेच इप्सॉस रिसर्च प्रा. लि.चे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी जिल्ह्यातील नागरिकांना सर्वेक्षणासाठी भेट देणाऱ्या अधिकृत कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे जिल्ह्याची अचूक सामाजिक व आर्थिक स्थिती शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.